रोगनियंत्रण

# असा करा आंबा मोहोरावरील भुरीचा बंदोबस्त



पी.बी. खैरे
(मो.नं. ९६६५३०४४६७)
महात्मा फुले कृषी विद्यापीठ,
राहुरी, अहमदनगर
डॉ. एस.व्ही. पवार
डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,
अकोला







महाराष्ट्रात आंब्याचे क्षेत्र ३,५७,२९० हेक्टर आहे. कोकण विभागात सर्वात जास्त क्षेत्र लागवडीखाली असून त्या खालोखाल पश्चिम महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. संपूर्ण देशाचा विचार केल्यास महाराष्ट्रातील आंब्याचा हंगाम उत्तर आणि दक्षिण भारतातील हंगामाच्या मध्यात येतो, त्यामुळे अधिक फायदा मिळू शकतो. आंबा मोहरावर पडणारा भुरी हा रोग अतिशय नुकसानकारक असून त्याचे निर्मूलन करणे गरजेचे आहे.

आंबा फळाची मधुरता आणि उपयुक्तता यामुळे आंब्याला फळांचा राजा म्हणतात. महाराष्ट्रात जवळ जवळ सर्व जिल्ह्यांत आंब्याची लागवड होते. आंबा पिकाखालील क्षेत्र आणि उत्पादनात भारताचा तसेच महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. महाराष्ट्रात आंब्याचे क्षेत्र ३,५७,२९० हेक्टर आहे. कोकण विभागात सर्वात जास्त क्षेत्र लागवडीखाली असून त्या खालोखाल पश्चिम महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. संपूर्ण देशाचा विचार केल्यास महाराष्ट्रातील आंब्याचा हंगाम उत्तर आणि दक्षिण भारतातील हंगामाच्या मध्यात येतो, त्यामुळे अधिक फायदा मिळू शकतो. आंबा मोहरावर पडणारा भुरी हा रोग अतिशय नुकसानकारक असून त्याचे निर्मूलन करणे गरजेचे आहे.

**ओळख** : आंब्याच्या मोहोरावर येणारा भुरी हा रोग बुरशीमुळे होतो. जेव्हा आंब्याला मोहोर येतो त्याचवेळी या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असतो. या रोगामुळे मोहोराचे देठ, फुले व लागलेल्या लहान फळांची गळ होते. यामुळे फळांच्या धारणेवर वाईट परिणाम दिसून येतो. आंबा पिकातील सर्वात जास्त नुकसानकारक रोग म्हणून या रोगाला ओळखतात. कोकण भागात भुरी रोगामुळे खूप मोठ्या प्रमाणावर हानी होते. हवामानातील होणाऱ्या बदलांमुळे या रोगाचा अनिष्ट परिणाम महाराष्ट्रातील इतर भागातही दिसून येतो. भुरी रोगाच्या बुरशीची बीजे कोवळ्या मोहोरावर किंवा पालवीवर उगवतात. त्यांची मुळे मोहोराच्या पेशींमध्ये शिरून अन्नरस शोषतात. सुरुवातीला रोगाची लागण मोहोराच्या शेंड्याच्या भागात होऊन नंतर इतरत्र पसरते. या रोगाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात झाल्यास आंब्याच्या मोहोराचे जवळपास ७० ते ८० टक्के नुकसान होऊ शकते. मोहोर फुटल्यानंतर लगेच प्रादुर्भाव झाल्यास फुलांची मोठ्या प्रमाणावर गळ होते. परिणामी फळधारणा होत नाही.



हा रोग ओइडिअम मेन्जिफेरी या रोगकारक बुरशीमुळे होतो. या बुरशीचा रंग पांढरट असतो. पांढरट रंगाची बीजे तयार झाल्यावर पांढरी भुकटी फवारल्यासारखी बुरशी दिसून येते. म्हणून या रोगाला 'भुरी' रोग असे नाव पडले आहे.

**वातावरण** : उष्ण व दमट हवामानामुळे कोकणात या रोगाचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव होतो. डिसेंबर-जानेवारी या कालावधीत आंब्याला मोहोरे फुटल्यावर या बुरशीची वाढ होते. कोवळ्या पानांवर सुद्धा या रोगाचा प्रादुर्भाव होतो. वाऱ्यासोबत या बुरशीचा प्रसार होतो. भुरी रोगाच्या बुरशीच्या वाढीसाठी तापमान २० ते २५ डि.से. आणि आर्द्रता ८०% हे अनुकूल वातावरण असते. जर ढगाळ वातावरण असेल आणि रात्रीचे तापमान कमी असेल तर भुरी रोगाचे प्रमाण वाढण्यास मदत होते.

**व्यवस्थापन** : सहसा आंबा पिकाची लागवड ही जिथे हवामान कोरडे आहे तिथेच करावी. जिथे जिथे गुंतागुंतीची वाढ झालेली आहे तिथे झाडाची नियमित छाटणी करावी व वाढलेले गवत काढून टाकावे जेणेकरून हवा खेळती राहील. आंतरपीक घेताना ते पीक रोगाचे यजमान पीक नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. झाडाचे रोगप्रादुर्भाव झालेले भाग काढून टाकावे व त्यांचा नायनाट करावा.

**जैव नियंत्रण** : बॅसिलस लिचेनिफोर्मिस या जैविक बुरशीनाशकाची फवारणी केल्यास भुरी रोगाचा संसर्ग कमी होतो. नीम तेल, ॲस्कॉर्बिक ॲसिड आधारित औषधे वापरल्यास या रोगाचा प्रादुर्भाव टाळता येतो.

**रासायनिक नियंत्रण** : पहिली फवारणी मोहोर येण्याआधी करावी. यासाठी २ ग्रॅम गंधक (८० टक्के पाण्यात मिसळणारे) प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. संपूर्ण हंगामात २-३ फवारण्या कराव्या. फळधारणेनंतर मोहोर झाडून स्वच्छ करून फवारणी करावी. जर फवारणी मोहोर फुटताच केली तर त्यामध्ये २० ग्रॅम पाण्यात मिसळणारे गंधक किंवा १० ग्रॅम कार्बेन्डेझिम मिसळावे. ■